**सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री**
**खरेदीबाबत**

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- सूतगि १०११/प्र.क्र.२०० /टेक्स १ (ब)
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २ डिसेंबर, २०११

**वाचा :-**

१) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि १२००/११७१३/प्र.क्र.४२६ /टेक्स १ (अ), दिनांक १५ जून २००६

**प्रस्तावना :-**

संदर्भीय शासन निर्णयान्वये सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदी / विक्री व स्थापत्य बांधकामाच्या निविदा मंजूरीसाठी विविध समित्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सहकारी सूतगिरण्यांच्या एकूण यंत्रसामुग्री खरेदी पैकी जवळपास ८० टक्के खरेदी ही लक्ष्मी मशिन वर्क्स लि. कोईंबतूर (LMW) या कंपनीकडून खरेदी करण्यात येत असल्यामुळे सदर शासन निर्णयातील यंत्रसामुग्रीच्या खरेदीबाबत काही सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनामध्ये नमूद केल्यानुसार या शासन निर्णयांन्वये लक्ष्मी मशिन वर्क्स लि. कोईंबतूर (LMW) कडून सूतगिरणीच्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीबाबत संबंधित सहकारी सूतगिरणीच्या संचालक मंडळाला अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२. सूतगिरणीच्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये नमूद केलेल्या किंमतीच्या मर्यादेमध्येच उपरोक्तप्रमाणे यंत्रसामुग्रीची खरेदी प्रस्तुत कंपनीकडून करण्यात यावी.

३. संबंधित सूतगिरणीने सदर खरेदीबाबत संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर, यांना अवगत करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१११२०२०७२०२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( श्री. बा. पवार )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव

I:\GRG.R.2010-11Common.lwp55

मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
प्रधान मुख्य सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई ३२
प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, मुंबई/सोलापूर/औरंगाबाद/नागपूर
श्री. दि. बा. पाटील, कक्ष अधिकारी, वेब को-ऑर्डिनेटर, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई.
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, वकील हाऊस,मुंबई.
निवड नस्ती (टेक्स १ अ / १ ब)